आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

३१ ऑगस्ट २०२६ -सोम वार

**ठळक बातम्या**

- चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत देशाचा आर्थिक विकास दर ७ पूर्णांक ८ दशांश टक्के

- SIR नंतर राज्याची प्रारूप मतदारयादी प्रसिद्ध, २ कोटी ८ लाखांहून अधिक नावं वगळली, ३० सप्टेंबरपर्यंत दावे-हरकती दाखल करता येणार

- उत्तर प्रदेशात अवैध फटाक्यांच्या कारखान्यात झालेल्या स्फोटात ११ जणांचा मृत्यू

**आणि**

- युक्रेन सोबतचे युद्ध संपवण्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुुतीन यांना आवाहन

**<><><><><>**

चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत देशाचा आर्थिक वृद्धी दर ७ पूर्णांक ८ दशांश टक्के राहिला आहे. गेल्यावर्षी याच कालावधीत हा दर ६ पूर्णांक ९ दशांश टक्के होता. या कालावधीत देशात ढोबळ राष्ट्रीय उत्पन्न ८१ लाख ३६ हजार कोटी रुपये होतं. या कालावधीत कृषी, पशुपालन, मासेमारी, खाणकाम यासारख्या क्षेत्रांची वाढ गेल्यावर्षीच्या ५ पूर्णांक ३ दशांश टक्क्याच्या तुलनेत २ पूर्णांक ९ दशांश टक्के होती. उत्पादन, बांधकाम, वीज-गॅस-पाणी पुरवठा यासारख्या क्षेत्रांमध्ये ८ पूर्णांक ६ दशांश टक्के वाढ नोंदवली गेली. गेल्यावर्षी हा दर ६ पूर्णांक १ दशांश टक्के होता. व्यापार, हॉटेल, परिवहन, दळणवळण, वित्त, स्थावर मालमत्ता, माहिती तंत्रज्ञान, संरक्षण यासारख्या क्षेत्रात गेल्यावर्षीच्या ८ टक्क्याच्या तुलनेत १० टक्के वाढ झाली.

देशाच्या अर्थव्यवस्थेनं साध्य केलेल्या या कामगिरीबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आनंद व्यक्त केला आहे. पुरवठा साखळीतले अडथळे आणि जागतिक पातळीवरच्या अनिश्चिततेच्या काळात नागरिकांनी सामुहिक ताकदीच्या बळावरच हा दर साध्य केल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

देशात चिप उत्पादनाला चालना देण्यासाठी केंद्र सरकारनं सेमीकॉन योजनेचा दुसरा टप्पा सुरू केला आहे. यासाठी १ लाख २७ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. भारतीय कंपन्यांनी या चिप्सची रचना करणं, त्यांच्या उत्पादनासाठी आवश्यक असणाऱ्या उपकरणांसाठी उत्पादन केंद्रं उभारणं, सेमींकडक्टर फॅब्स, चिप्सची जोडणी, पॅकेजिंग आणि चाचण्या अशा सहा भागांचा समावेश या योजनेत करण्यात आला आहे. सेमीकंडक्टर उद्योगाच्या संपूर्ण मूल्यसाखळीला आर्थिक पाठबळ देण्यात येईल, असं सरकारनं याबद्दलच्या अधिसूचनेत म्हटलं आहे.

**<><><><><>**

SIR अर्थात विशेष सखोल पुनरीक्षणाच्या अंतर्गत राज्यातल्या २८८ विधानसभा मतदार संघाच्या प्रारुप मतदार याद्या आज प्रसिद्ध झाल्या. त्यात २१ टक्क्याहून अधिक म्हणजेच २ कोटी ६ लाख ८८ हजार ४८७ मतदारांची नावं वगळण्यात आली आहेत. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

## होल्ड - कॅप्सूल

*(विशेष सखोल पुनरीक्षणाच्या नंतर राज्याच्या प्रारुप मतदार यादीत ७ कोटी ७१ लाख ६५ हजार ५६२ मतदारांचा समावेश आहे. मतदार यादीत नमूद ठिकाणी अनुपस्थित, स्थलांतर, मृत्यू, दुबार नोंदणी किंवा गणना पत्र भरायला नकार दिल्यामुळं २ कोटींहून अधिक मतदारांचा प्रारुप मतदार यादीत समावेश नाही. पुणे, ठाणे, मुंबई उपनगर, नागपूर, नाशिक या जिल्ह्यातून सर्वाधिक तर सिंधुदुर्ग, हिंगोली आणि गडचिरोलीतून सर्वात कमी मतदारांची नावं वगळण्यात आली आहेत. सर्वाधिक २८*

*लाख ६६ हजारांहून अधिक मतदार पुण्यातले तर २८ लाख ५९ हजारांहून अधिक मतदार ठाणे जिल्ह्यातले आहेत. मुंबई उपनगरमधून २६ लाख ५८ हजारापेक्षा अधिक तर नागपुरातून १४ लाख ४३ हजारापेक्षा अधिक मतदारांची नावं प्रारुप मतदार यादीत नाही. सिंधुदुर्गमध्ये हे प्रमाण सर्वात कमी म्हणजे ८२ हजार ५१३ इतकं आहे. गडचिरोली, हिंगोलीच्या यादीतून १ लाखापेक्षा कमी मतदार वगळलेले आहेत.*

*मतदार यादीतून नाव वगळलेल्या मतदारांना आजपासून ३० सप्टेंबरपर्यंत दावे आणि हरकती दाखल करता येतील. प्रारुप मतदार यादीत नाव नसलेल्या मतदारांना किंवा १ ऑक्टोबरला १८ वर्ष पूर्ण करणाऱ्या मतदारांना प्रपत्र ६ मध्ये घोषणापत्रासह भरावे लागेल. पडताळणीनंतर त्यांची नाव मतदार यादीत समाविष्ट होऊ शकतील. सर्व कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर ४ नोव्हेंबर रोजी अंतिम मतदारयादी प्रसिद्ध होईल. याविषयी राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम म्हणाले*

*होल्ड - चोकलिंगम*

*या प्रक्रियेदरम्यान राज्यातल्या मतदान केंद्रांचंही सुसूत्रीकरण करण्यात आलं आहे. त्यानंतर एकूण ३७ मतदान केंद्र कमी झाली. मतदार कमी झाल्यानं हा बदल झाला आहे, असं निवडणूक आयोगानं कळवलं आहे. याशिवाय १ हजार ४०३ मतदार केंद्रांचं ठिकाण बदलण्यात आलंय. प्रामुख्यानं मुंबई, ठाणे, पालघरमधली ही मतदान केंद्र आहेत.)*

**<><><><><>**

उत्तर प्रदेशमधल्या कौशाम्बी इथं फटाक्यांच्या कारखान्यात झालेल्या प्रचंड स्फोटामुळं २ मुलांसह ११ जण मृत्युमुखी पडले असून अन्य ५ जण गंभीर जखमी झाले आहेत. या कारखान्यात फटाक्यांची अवैध निर्मिती तसंच साठवण करणाऱ्या ६ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचं सूत्रांनी सांगितलं आहे.

**<><><><><>**

मणिपूरमध्ये जनगणनेची प्रक्रिया केंद्र सरकारनं पुढे ढकलली आहे. तिथे उद्यापासून घर नोंदणीची प्रक्रीया सुरू होणार होती. पण विविध स्थानिक संघटनांनी जनगणनेच्या आधी NRC अर्थात राष्ट्रीय नागरिक नोंदणी प्रक्रिया करण्याची मागणी केल्यानं सरकारनं हा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

पंजाबमध्ये विधानसभा निवडणूक स्वबळावर लढायचा निर्णय भाजपानं घेतला आहे. सर्व ११७ जागांवर भाजपाचे उमेदवार उभे राहतील असं भाजपाचे प्रदेश प्रभारी सतीश पुनिया म्हणाले. या निवडणुकीत भाजपा कुठल्याही पक्षासोबत युती करणार नसल्याचं त्यांनी स्पष्ट सांगितलं.

**<><><><><>**

युक्रेनबरोबरचं युद्ध लवकरात लवकर संपवावं, असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांना केलं. किर्गिस्तानची राजधानी बिश्केक इथं होणाऱ्या शांघाय सहकार्य संस्था SCOच्या शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर, मोदी यांनी पुतीन यांची भेट घेतली. निरंतर चालणाऱ्या युद्धाकडून युद्ध संपवण्याकडे वाटचाल करणं अतिशय महत्त्वाचं आहे, असं प्रतिपादन त्यांनी यावेळी केलं.

***होल्ड... बाईट- नरेंद्र मोदी***

युद्ध समाप्तीच्या मार्गातल्या सगळ्या अडचणींवर लवकरात लवकर शांतिपूर्ण मार्गाने तोडगा काढावा, हीच मानवतेची हाक आहे आणि भारताचा संदेश आहे, असंही मोदी यावेळी म्हणाले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज इराणचे अध्यक्ष डॉक्टर मसूद पेझेश्कियन यांच्याशी बैठक घेतली. आखाती भागातल्या वाढत्या तणावाबद्दल प्रधानमंत्री मोदी यांनी चिंता व्यक्त केली आणि सर्व समस्या संवाद आणि मुत्सद्देगिरीने सोडवाव्यात, या भारताच्या भूमिकेचा पुनरुच्चार केला. कोणत्याही परिस्थिती नागरिक आणि नागरी पायाभूत सुविधा, व्यावसायिक नौवहन आणि दर्यावर्दींना धोका पोहोचता कामा नये, असं आवाहन त्यांनी केलं.

त्यानंतर प्रधानमंत्र्यांनी किर्गिस्तानचे अध्यक्ष सादिर झापारोव्ह आणि अर्मेनियाचे प्रधानमंत्री निकोल पाशिन्यान यांचीही भेट घेतली.

पाकिस्तानचे प्रधानमंत्री शाहबाज शरीफ सुद्धा या परिषदेसाठी पोहोचले आहेत. SCO Plus परिषदेतही ते सहभागी होतील आणि SCOच्या देशप्रमुखांच्या परिषदेचं पाकिस्तानचं अध्यक्षपद स्वीकारतील.

<><><><><>

यंदाचा ऑगस्ट हा १९०१ पासूनचा सर्वात उष्ण ऑगस्ट असून यात सरासरी तापमान २८ पूर्णांक १ शतांश होतं, अशी माहिती हवामान विभागानं दिली. सप्टेंबर महिन्यात सरासरी कमाल तापमान सामान्य पातळीपेक्षा जास्त असेल, असंही हवामान विभागानं म्हटलं आहे. सप्टेंबर महिन्यात देशभरात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडेल, असा अंदाज हवामान विभागानं मासिक अंदाजपत्रात व्यक्त केला आहे.

//<><><><><>//